INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 7.560 (SJIF 2024)

# थोरले रघुजी भोसले यांची प्रशासन व्यवस्था - एक दृष्टिक्षेप

# (The Elder Raghuji Bhosale's Administrative System: An Overview)

**डॉ. सावंत कैलास ज्ञानोबा**

(इतिहास विभाग प्रमुख)
महिला महाविद्यालय, गेवराई,
E-mail: kailassawant09@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/07.2024-65359631/IRJHIS2407008

**प्रस्तावना :**

नागपुरकर कान्होजी भोसले यांनी वारंवार स्वाऱ्या करुन अर्ध विजित केलेल्या प्रदेशात स्वत:ची भर टाकून त्याचे सुसंघटित राज्य करणे ही महत्वाची कामगिरी अठराव्या शतकातील थोर राजकारणी मत्सदी आणि सेनापती थोरले रघुजी भोसले यांनी केलेली दिसते. त्यांच्या आयुष्याचा अभ्यास पर्शियन, इंग्रजी, फ्रेंच, मराठी, ओडिया आणि हिंदी भाषांमधील अभिलेखात विखुरलेला सुस्पष्ट दिसतो.

नागपुरकर परसोजी भोसले व कान्होजी भोसले यांचे घराणे बुडाल्यामुळे अभिलेखागारातील कागदपत्राशिवाय यांची माहिती मिळणे शक्य होत नाही. ते घराणे थोरले रघुजी भोसलेला शत्रूवत असल्यामुळे थोरले रघुजी भोसले यांना अगदी शून्यातूनच प्रारंभ करावा लागलेला दिसतो. थोरले रघुजी भोसले यांना अक्षरश: 'रात्रंदिवस आम्हा युध्दाचा प्रसंग, मन आणि शरीर अंतर्बाह्य' अशा परिस्थितीला तोंड द्यावे लागले. यशस्वी होण्याची आशा जवळपास नव्हतीच. हिंगणीकर भोसले यांच्या घराण्यात सुध्दा रघुजी भोसले यांच्या नेतृत्वावर एकमत नव्हते. थोरल्या पातीचा रायाजी भोसले आपल्या योग्यतेचा आणि सामर्थ्याचा विचार न करता थोरले रघुजी भोसले यांना उलथून पाडून आपल्या वडिलांनी गमावलेले राज्य परत मिळविण्याची संधी पाहात होता. थोरले रघुजी भोसले यांचे शत्रू सुध्दा अनुभव, युध्दनेतृत्व आणि साधनांच्या बाबतीत त्यांच्यापेक्षा काकणभरही कमी नव्हते असे दिसते. तरीपण त्याने आपल्या नागपूर राज्याची निर्मीती करुन भोसले वंशाची स्थापना केलेली दिसते.

थोरले रघुजी भोसले यांच्या मृत्युच्या वेळी त्यांचे राज्य माणिक दुर्ग व्यतिरिक्त वर्धा नदीच्या पुर्वेपासून बंगालच्या उपसागरापर्यंत पसरले होते. दक्षिणेला त्यांच्या राज्याची सीमा वैनगंगा आणि वर्धा नदीच्या संगमापासून गोदावरी नदीपर्यंत तेथून वाकड्या तिकड्यारेषेने एल्रपासून उत्तरेला चिल्का सरोवरापर्यंत होती. उत्तरेला ओरिसा बंगालच्या सीमेवरील सुवर्णरेखा नदीपासून महाकोशलच्या पठारी प्रदेशातील अनिश्चित सीमेने पेशवे भोसले यांच्यातील विवाद ग्रस्त मंडला राज्यापर्यंत तेथून नर्मदेच्या काठाने होशगाबादपासून दक्षिणेला मकडाई, गाविलगड व वऱ्हाडचा उत्तर सीमेवरुन वर्धा नदीपर्यंत या राज्याची सीमा होती. याशिवाय वऱ्हाडातील चौथाई सरदेशमुखीच्या हक्कासाठी सहा प्रांतांवर सहा सुभेदार होते. पूर्वीचा ओरिसा प्रांत स्थानिक मांडलिकासह एका स्वायत्त मुस्लिम सुभेदाराच्या अखत्यारात होता. रतनपुरचा सुभा म्हणजे एक मांडलिक राज्यच होते. त्यात स्थानिक राजघराण्याच्या मोहनसिंग या फितुरास भास्कराने सत्तारुढ केले होते. मोहनसिंगास मराठी बखरकाराने उपहासाने लोकावळा म्हटले आहे.[1] देवगाडा, चांदा, वऱ्हाड येथे थोरले रघुजी भोसले यांनी नेमलेले सुभेदार काम पाहात

होते.

थोरले रघुजी भोसले यांनी शेवटच्या पाच वर्षात जिंकलेल्या दारव्हा, भाम वगैरे प्रदेशास निजामशाहीने जागीर म्हणून मान्यता दिली होती. या प्रदेशाखेरीज गढामंडल्याचा विवाद थोरले रघुजी भोसले यांच्या मृत्युपर्य सुटला नसल्याचे दिसते. राजा छत्रपतीशाहूने या राज्यातील चौथाई सरदेशमुखीचा हक्क थोरले रघुजी भोसले यांना तर मोगलाई हक्क म्हणजे वारसा शुल्कासह एकूण राजस्वाच्या 65% टक्के रक्कम पेशव्यास दिली.[2] पण स्थानिक राजाने दोघांच्या भांडणात स्वत:चा फायदा साधून या समझोत्याची अंमलबजावणी होऊ दिली नाही.

या विजित अगर मांडलिक प्रदेशाव्यतिरिक्त वऱ्हाडपासून गोदावरी नदीपर्यंतच्या प्रदेशावर थोरले रघुजी भोसले यांचा कोणत्याही कायदेशीर अधिकार नव्हता. पण या प्रदेशातून म्हणजे गंगथडीतून तो घासदाणा घेत असे.

**राजस्व आणि खजिना** :-

सर्व बखरी आणि तवारिखिंनी थोरले रघुजी भोसले यांनी बंगाल मधून फार मोठी संपत्ती आणली असे वर्णन केले आहे पण त्यात तथ्य नाही. कान्होजीने छत्रपती शाहू महाराजांविरुध्द बंड केले. त्यावेळी तो 29 लाखाचा लष्करी सरंजामी होता. थोरले रघुजी भोसले यांचा सरंजाम 9 लाखाचा होता आणि हिंगणीकर भोसले यांचा एकूण सरंजाम 74 लाखांचा होता. यात बंगालची खंडणी 12 लाख रुपये व ओरिसाची खंडणी 4 लाख रुपये जोडले तर 90 लाख होत असल्याचे दिसतात. शिवाय घासदाण्याचे 5 ते 10 लाख जोडले तर थोरले रघुजी भोसले यांचे एकूण उत्पन्न एक कोटीच्या घरात जात असल्याचे दिसते. या कागदी आकड्यापेक्षा प्रत्यक्ष वसुली बरीच कमी असावी कारण थोरले रघुजी भोसले आणि त्याच्या सुभेदारीभोवती नेहमी घेणेकऱ्यांचे धरणेच दिसते. म्हणून थोरले रघुजी भोसले जेंव्हा "ऐश्वर्याच्या ऐन भरात" दिवंगत झाले तेंव्हा त्याने मुलांसाठी मोठा खजिना ठेवण्याऐवजी काही लाखांचे कर्जच करुन ठेवले असल्याचे दिसते.[3]

**राजस्वाचे धोरण** :-

प्रशासकीय दृष्टीने सेनासाहेब सुभापदावर थोरले रघुजी भोसले यांची नियुक्ती म्हणजे कायदा आणि सुव्यवस्थेचे जादा काम करणाऱ्या राजस्व आयुक्ताची नियुक्ती होती. त्याच्या प्रत्येक सनदेत त्याचा मोकासदार म्हणून स्पष्ट उल्लेख आहे. थोरले रघुजी भोसले यांचे लष्करी पराक्रम प्रसिध्द असले तरी मनाने ते शेतकरीच होते. अवघ्या दोन पिढ्यांपूर्वी त्यांच्या पूर्वजांनी आपल्या भूमिच्या रक्षणासाठी हत्यार उचलले होते त्यामुळे शेतकऱ्यांचे हित त्यांच्या मनात नेहमीच होते हे अनेक चक्षुर्वैसत्यम पूराव्यावरुन सहज सिध्द करता येईल. शेतीव्यवसाय हा राजस्वाचा मुख्य आधार असल्यामुळे शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण हे मराठा राज्यकर्त्याचे सर्वसाधरण धोरण होते. युध्द दुष्काळ इतर आपतीच्यावेळी जमीनदार व रयतेला राजस्वात सुट देणे ही सरकारची रीतच होती. सरकार शेतकऱ्यांना अग्रीम तकावी देण्याचीही तरतूद करीत असे.

देशमुख-ठाकूर यांसारख्या जमीनमालकाच्या मध्यम वर्गास समाप्त करावे असे थोरले रघुजी भोसले यांच्या मनात होते. थोरले रघुजी भोसले गोंडावण आणि ओरिसात आपले राज्य स्थापल्यावर हे लोक अनियंत्रित झाले व त्यांनी जमिनीचा कब्जा घेतला. मोगलांसाठी राजस्व वसूल करणारे हे वंशानुगत जमीनदार आपल्या संग्रहित संपत्तीच्या जोरावर बलदंड झाले. ते सरकारच्या कमावीसदारांना भेटत नसत आणि खेड्याने सरकारला जास्त सारा द्यावा असे म्हटले तर भांडायला उठत.[4] पण अशा प्रबळ वर्गाला नष्ठ केले तर सरकारी यंत्रणा त्यातच गुंतून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाला असता, बराच काळ हा पेच प्रसंग सहन केल्यावर थोरले रघुजी भोसले यांनी मध्यम मार्ग काढला त्यांनी जुनी वतने कायम ठेवून मराठयांनी निर्माण केलेली नवी वतने रद्द केली.[5] अशा रितीने वतनदारी पध्दत नियंत्रित करण्याचा प्रयत्न केल्यावर अखेर थोरले रघुजी भोसले यांनी या पध्दतीशी जुळवून घेतले, कारण ते ही अखेर एक वतनदारच होते.

**सैन्यशक्ती** :-

अस्सल कागदपत्रांच्या ढिगाऱ्यातून आता थोरले रघुजी भोसले यांच्या सैन्याच्या वाढीचा आलेख काढता येतो त्यांच्या लष्करी कारकीर्दीच्या प्रारंभी त्यांच्या जवळ त्यांचा चुलता राणोजी भोसलेच्या दोन हजार घोडेस्वारांसह चार हजार सैन्य असल्याचे दिसते.[6] नागपूर येथेच समाप्त झालेल्या एका बंगाल मोहिमेत त्यांच्याजवळ सर्वात जास्त म्हणजे 20 हजार घोडेस्वार, 25 हजार पायदळ आणि 300 तोफा

होत्या. कर्नाटक स्वारीत त्यांनी सर्व मराठा सरदारांच्या 50 हजार सैन्याचे नेतृत्व केले हे एक नवलच होते. पण भास्करपंत कोल्हाटकरांच्या पहिल्या बंगाल स्वारीत केवळ 12 हजार घोडेस्वारच होते. थोरले रघुजी भोसले यांनी स्वत: बंगालवर स्वारी केली तेंव्हा त्यांच्याजवळ फक्त दहा हजार घोडेस्वारच होते.[7] आसफजाही युध्दात त्यांच्याजवळ सुमारे 15 हजार घोडेस्वार होते. तरीही थोरल रघुजी भोसले जवळ जुजबी प्रतिकारासाठी काही सैन्य राखीव होते. त्यांच्या घोडेस्वाराचे शिलेदार आणि पागा असे दोन मुख्य विभाग होते.

थोरले रघुजी भोसले यांच्या यशात त्यांच्या उत्साही मुस्लीम सेवकांचा मोठाच वाटा असल्याचा दिसतो. थोरले रघुजी भोसले यांच्या राजकारणाप्रमाणे त्यांच्या लष्करी कारकीर्दीत आणि प्रशासनात त्यांनी महत्वाची कामगिरी बजावली असे दिसते. अलिकवार ह्या प्रमुख मुस्लीम अधिकाऱ्याने भास्करपंत कोल्हटकराबरोबर आपलेही प्राण गमावले. मीर हबीब आणि मिर्झा सालेह हे त्याचे ओरिसातील सुभेदार होते. सरमस्तरवान पन्ही अफगाण हा निजामाच्या दरबारात त्यांचा राजदूत होता.

**नागरी प्रशासन** :-

छत्रपती शिवाजी महाराजाप्रमाणे थोरले रघुजी भोसले आपले मंत्री निवडण्यास स्वतंत्र नव्हते. त्यांचे मंत्री त्याच्या स्वत:च्या नियुक्ती सोबतच नेमले गेले आणि तात्विक दृष्ट्या ते सर्व राजनिष्ठ होते. पण प्रत्यक्षात थोरले रघुजी भोसले यांनी या राजकीय मंत्र्याच्या हाती फारच थोडी सत्ता राहू दिली. वस्तुत: ते स्वत:चाच मंत्री होते.

नागपूरच्या राज्याचा सर्वोच्च अधिकारी सेनासाहेबसुभा या पदाची ब्रिटिश भारतातील गव्हर्नर जनरलच्या पदाशी तुलना करता येण्यासारखी आहे. दोघेही राजकृपेने नियुक्त व निवृत मान होते. दोघांनाही प्रादेशिक सुभेदारावर देखरेख ठेवावी लागे, दोघेही स्थानिक अधिकारी या नात्याने युध्द किंवा शांतता करा करु शकत. आवश्यक पडल्यास दोघेही न्यायालयात हस्तक्षेप करीत. राजकीय, लष्करी आणि न्याय विभागासंबंधी त्यांना पालन करावे लागे. छत्रपतीच्या दरबारात फारसे हजर राहावे लागत नसल्यामुळे त्यांना बरेस कृतिस्वातंत्र्य होते.

कान्हीजीच्या काळातील भोसले यांच्या प्रशासन मंडळात दिवाण, मजुमदार, पोतनीस, फडणीस व जमेनीस हे पाच अधिकारी होते. पण इ.स.1733 मध्ये थोरले रघुजी यांची नियुक्ती झाली तेंव्हा 23 मे 1733 रोजी सहा मंत्र्यांची नियुक्ती 7 सप्टेंबर रोजी झाली स्वत: थोरले रघुजी भोसले यांची नियुक्ती 22 नोव्हेंबर 1733 रोजी झाली.

1) दिवाण - राज्याचे सामान्य कल्याण पाहणे, सर्व दरखदारांत एकमत राखणे व राज्यप्रमुखाच्या गैरहजेरीत त्यांचे प्रतिनिधीत्व करणे हे त्यांचे कर्तव्य होते. त्याचे वार्षिक वेतन 5000 होन होते.
2) मजुमदार - याला सार्वजनिक आयव्ययचे सर्व हिशेब तपासून राज्यप्रमुखास माहिती द्यावी लागे. राज्य आणि प्रांताच्या हिशेबावर तो प्रतिहस्ताक्षर करीत असे त्याचे वार्षिक वेतन 5000 होन होते.
3) फडनवीस - हा राजस्वाचे सर्व हिशेब आणि परगण्याची सर्व कागदपत्रे बाळगत असे. सरकारी घोड्यासह त्याचे वार्षिक वेतन 4000 होन होते.
4) जमेनवीस - राज्यातील सर्व सरदार आणि सैन्याचे हिशेब तो तयार करीत असे. सरकारी घोड्यासह त्याचे वार्षिक वेतन 4000 होन होते. जमेनविसाच्या मदतीला दोन कारकुनासह 2000 होन वार्षिक वेतनाचा एक मजुमदार असे.
5) शिक्केनवीस - जाणाऱ्या सर्व पत्रांचे मसुदे योग्य आहे की नाही ते तपासून त्यात दुरुस्त करुन त्यावर शिक्का मारत असे. सरकारी घोड्यासह वार्षिक वेतन 3000 होन होते.
6) सबनीस - सैन्याची हजेरी लिहून त्यांच्या वेतनाचे बिल तयार करीत असे सरकारी घोड्यासह त्याचे वार्षिक वेतन 2000 होन होते
7) चिटणवीस - सर्व प्रकारचे पत्रव्यवहार, आदेश, परवाने लिहुन त्यावर तारीख टाकण्याचे काम करीत असे. त्यांचे वार्षिक वेतन 1000 होन होते.
8) डबीर किंवा मुन्शी - निजाम-उल-मुल्क आणि अलीवर्दी यांच्याशी स्वतंत्र पत्रव्यवहार सुरु झाल्यावर थोरले रघुजी भोसले यांनी या पदाची निर्मिती केली असावी. पहिला मुन्शी चिटकोपंत होता पण त्याचा सहायक हैदर कुली हाच काम पाहात असे. त्याचे वेतन माहित नाही.

**गुप्तचर व्यवस्था** :-

कौटिल्याने राजाला चार चक्षु म्हटले आहे. याला नागपूरचे राज्यसुध्दा अपवाद नव्हते. या विभागाचे नावच गुप्तचर असल्यामुळे त्याचे संदर्भ फारच दुर्मिळ आहेत. निरोप्य, जासूद, हरकारा हे या व्यवस्थेचे कनिष्ठ घटक होत. पाच ते 25 लोकांच्या एका गटास जथा म्हणत. प्रत्येक गुप्तहेर आपल्या जथ्याच्या नावे ओळखला जाई. फितुरी टाळण्यासाठी एका जथ्यात कमीत कमी दोन जासूद तरी ठेवलेच जात. जथ्याच्या प्रमुखाला नाईक म्हणत. नाईक साक्षर असे तो त्याच्या जासुदांनी मिळाविलेली बातमी स्वत: किंवा दरोगा-ए-हरकारा मार्फत राज्यप्रमुखास देत असे. या महत्वाच्या पदावर थोरले रघुजी भोसले यांनी संताजी नाईक यास नियुक्त केले होते. मराठा वकील हा आपल्या मालकासाठी हेरगिरी करीत असे.

पाणीपुरवठा नद्यांचे उतार, लपविलेली संपती, राजकीय कारस्थाने आणि शत्रू सैन्याच्या हालचाली इ. सर्व महत्वाच्या बाबी कळविणे हे गुप्तचरांचे कर्तव्य होते साधू, सन्याशी व प्रवाशाच्या वेशात गुप्तहेर वावरत. ते परस्पंराशी ही पत्रव्यवहार करीत.[8] गुप्तहेर शत्रूच्या हाती सापडला तर त्याला मारहाण व इतर शिक्षा होण्याची मोठीच भीती असे. वकिलांना तर प्राणदंड होण्याची किंवा तुरुंगात पडण्याची शक्यता निश्चित असे. थोरले रघुजी भोसलेचे गुप्तचर इतके तत्पर होते की, ते आपल्या प्रतिपक्षीयांपेक्षा पुढेच राहत असत. कर्नाटक आणि बंगालमधील थोरले रघुजी भोसले यांच्या यशाचे श्रेय त्यांच्या राज्याच्या गुप्तचर व्यवस्थेकडे जाते.

**न्यायव्यवस्था** :-

न्यायव्यवस्था ही ग्राम पातळीवर सुरु होते असे. खुनासारखे गंभीर गुन्हेसुध्दा स्थानिक पातळीवर दंड पावत, त्यांना फक्त उच्चधिकाऱ्यांची संमती आवश्यक असे वादीप्रतिवादी किंवा स्थानीक अधिकारी पंचायतीची किंवा लवादाची नियुक्ती करीत. आमील, सुभेदार, सेनासाहेब, सुभा आणि राजाकडे दाद मागण्याची नेहमीच सोय असे. छत्रपती शाहू तत्परतेने न्याय मिळवून देण्यास मदत करीत. एका प्रकरणात तर त्याने आपल्या अधिकाऱ्याप्रमाणे निजामाच्या अधिकाऱ्यासही ताकीद देण्यास कमी केले नाही.

दिवाणी व फौजदारी खटल्यात काहीच फरक नव्हता. सुनावणीची पध्दत सोपी आणि सांक्षिप्त होती. लेखी जबानी व खटल्याचे नियम उपनियम नव्हते. तरीपण महत्वाचे निर्णय उभय पक्षाचे युक्तीवाद व पंचायतीच्या सारांशासह लिहिले जात. उभय पक्षाच्या संमतीने झ ाालेले निर्णय आपोआपच दोघांनाही बंधनकारक राहत.

शिक्षेचे प्रकार ठरविताना जुन्या परंपरेचे अनुकरण केले जाई इंधन चोरणाऱ्या चोरास आर्थिक दंड दिला जाई. दरोडा, खून यासारख्या गंभीर गुन्हेगारास तुरुंगवास किंवा अंगभंगाची शिक्षा दिली जाई. मानवी पुरावा नसल्यास दैवी साक्ष मिळविण्यासाठी लालभडक तापलेली लोखंडी शलाका धरणाचे किंवा उकळत्या तुपात हात घालण्याचे दिव्य करावे लागे. अशाही प्रकरणात पंच लवादाशी तर्कयुक्त युक्तिवाद करण्यात येत असे आणि म्हातारपण किंवा दिवाळ खोरीच्या निमित्ताने गुन्हेगारास सौम्य शिक्षा होत असे.

**थोरले रघुजी भोसले यांच्या राजवटीचा परिणाम** :-

हे सार थोरले रघुजी भोसले यांच्या राजवटीचे तात्वीक विवेचन झाले, पण ते प्रत्यक्ष हजर नसले तरी ही तत्वे धाब्यावर बसविले जात. त्यामुळे ‘‘छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात सुरु झालेली युरोपियन व्यापाऱ्याची मैत्री त्याला हवी आहे.’’ हा थोरले रघुजी भोसले यांचा दावा दिसतो. ओरिसातील त्यांच्या अधिकाऱ्यांच्या इंग्रजांशी झालेल्या वागणुकीने लटका पडतो. थोरले रघुजी भोसलेला सदासर्वकाळ सर्वत्र राहणे शक्य नव्हते म्हणून त्यांच्या बारगिरांची व बाजार बुणग्यांची लुटालुट ते रोखू शकत नव्हते. मराठी सैन्याच्या पिछाडीस लुटारुच्या टोळ्या चालत.[10] लुटालुट करणाऱ्या मराठी सैन्याची तर्कशुध्द परिणती पेंढारगर्दीत झ ााली त्यात सामूहिक बलात्कारांचेही उल्लेख आहेत.

थोरले रघुजी भोसले यांनी आपल्या शेजाऱ्याच्या लुटालुटीचे समर्थन केलेले नाही, ते करणे शक्यही नव्हते. यांच्यासंदर्भात लेखी राजाज्ञा होती म्हणून त्याला कोणाचीच पर्वा नव्हती. मराठा राज्याचे अस्तित्वच त्याच्या शेजारच्या मुस्लिम राज्याच्या मुळावर येणार होते आणि त्यांची येनकेन प्रकरणे प्राणहानी, वित्तहानी करणे हे त्याचे कर्तव्य होते.[11] तथापि गोंडावनातील प्राचीन हिंदू गोंड राजाचा तो त्राता

असल्यामुळे प्रत्यक्ष युध्दाखेरीज एकदाही लुटालुट झाल्याचे वृत्त नाही.[12] एवढेच काय पण गोंडवनाच्या रक्षणासाठी त्याने राजकीय समझोते करण्यासही मागेपुढे पाहिले नाही.

**सारांश** :-

त्यांच्या साधनांचा नैतिक दर्जा कोणताही असला तरी त्याचे यश एक देदीप्यमान सत्य आहे. हा पितृहीन मराठा मुलगा त्यांच्या काळातील बलिष्ठतम मोगल किंवा मराठा नेतृत्वाचा दुर्दम्य प्रतिस्पर्धी ठरला. ही वस्तुस्थिती भारतीय तसेच विदेश समकालीनांना पक्की ठाऊक होती. थोरले रघुजी भोसले यांचा बंदोबस्त कसा करावा हे कोणालाच उमगत नसल्याचे दिसते. बंगालात त्यांचा खून करणे जमले नाही म्हणून त्यांचे चारित्र्यहनन करण्यात आले. निजाम आणि त्याच्या मुलांनी संतुष्टीकरणाचे धोरण अंगीकारले तर पेशवा आणि त्यांच्या बंधुनी आकाशपाताळ एक केले. एकाने त्यांचा मित्रासह घात करण्याचा सल्ला दिला तर दुसऱ्याने त्यांच्या मुलाचा खून करण्याचे दिवास्वप्न पाहिल्याचे दिसते. भारतातील सर्वोत्तम फ्रेंच सेनापती आणि मुत्सदी मॉसिएर बुसी याने थोरले रघुजी भोसले यांच्याशी उभय पक्षी अहस्तक्षेपाचा समझोता केला. पण हा समझोता आपल्या फायद्याचा नाही आणि चिरकाल टिकणारा नाही असे फ्रेंच भारताचा गव्हर्नर जनरल मॉसिएर डुप्लेला वाटत होते. बंगालचा नबाब सिराजउद्दोला याचे मत अगदी विरुध्द होते. मराठ्याजवळ ईश्वरीय पुस्तक नाही तरीही त्यांनी बंगालच्या चौथाईचा करार प्रमाणिकपणे पाळला. सतत 10 वर्ष त्रास झालेल्या शत्रूकडून अशी आदरांजली मिळणे हेच थोरले रघुजी भोसले यांचे खरे यश आहे.

**संदर्भ सूची** :

1) गुप्ते काशिराव राजेश्वर, काळे यादव माधव, (संपा), नागपुरकर भोसल्यांची बखर, दुसरी आवृत्ती, नागपूर, 1936, पृष्ठ 55 व 78
2) सरदेसाई गो.स.,(संपा), ऐतिहासिक पत्रव्यवहार, लेखक 35, 36, पृष्ठ 25-26
3) शेजवलकर त्रिंबक शंकर, नागपुर ॲफेयीअर्स, भाग-1, डेक्कन कॉलेज पोस्ट ड्युट आणि रिसर्च इनस्ट्युट, पुणे, 1954, लेखन-1, पृष्ठ 1
4) सरदेसाई गो.स., (संपा), पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड-20, गव्हन्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, 1932, लेखन 45, पृष्ठ 37
5) वैद्य शंकर लक्ष्मण, (संपा), वैद्य दाप्तरातून निवडलेले कागद, खंड-4, पुणे, 1871, लेखन-27, पृष्ठ 23
6) सरदेसाई गो.स., (संपा), पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड 10, गव्हन्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, 1930, लेखन-3, पृष्ठ 7
7) सरदेसाई गो.स., (संपा), पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड 20, गव्हन्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, 1933, लेखन-7, पृष्ठ 6
8) सरदेसाई गो.स., (संपा), पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड 20, उपरोक्त, लेखन- 47, पृष्ठ 39
9) किता, लेखन - 34, पृष्ठ 27
10) सरदेसाई गो.स., (संपा), पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड 27, उपरोक्त, लेखन -11, पृष्ठ 11
11) पगडी सेतु माधवराव, एटिन्थ सेंच्युरी डेक्कन, (इंग्रजी), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, 1885, पृष्ठ 146,47
12) सरदेसाई गो.स., (संपा), पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड 25, गव्हन्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, 1932, लेखन-135, पृष्ठ 147